| MHSN-02-001303-2022 | |
|---|---|
| | प्राप्त दिनांक – २२.०६.२०२२. |
| | नोंदणी दिनांक – २३.०६.२०२२. |
| | **निकाल तारीख – २८.०७.२०२६.** |
| | कालावधी – **०४व.०१म.०५दि.** |

**सहावे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, सांगली, जि.सांगली यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी – सोपान पांडुरंग राचकर.)**

| | |
|---|---|
| **नियमीत दिवाणी दावा क्र.२२४/२०२२** | **निशाणी क्र.२९.** |

**सौ. प्राजक्ता अभिनंदन कोईक,**
वय – २६ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
रा.रुई, ता. हातकणंगले, जि.कोल्हापुर. **... वादी.**

**विरुध्द**

१. **श्रीमती कमल रावसाहेब वांजुळे,**
वय – ६९ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,

२. **श्री. सुकूमार रावसाहेब वांजुळे,**
वय – ४९ वर्षे, व्यवसाय – शेती,

३. **सौ. वंदना सुकूमार वांजुळे,**
वय – ३५ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
नं.१ ते ३ रा.माळवाडी, ता. मिरज,जि.सांगली.

४. **सौ. रुपाली उर्फ आरती दिपक लांडे,**
वय – २२ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
रा. सावळवाडी, ता. मिरज,
जि.सांगली. **... प्रतिवादी.**

| दावा– घोषणा, वाटपाकरीता व निरंतर मनाई आदेश मिळणेकरीता. |
|---|

| | | |
|---|---|---|
| **विधीज्ञ श्री.एन.पी.मेडशिंगे.** | – | वादीतर्फे. |
| प्रतिवादीं – एकतर्फा. | | |

## <u>न्या य नि र्ण य</u>

( दिनांक **२८ जुलै, २०२६** रोजी घोषित )

**०१.** वादीने प्रस्तुतचा दावा हा घोषणा, वाटपाकरीता व निरंतर मनाई मिळणेकरीता दाखल केला आहे.

## <u>मि ळ क ती चे व र्ण न</u>

**अ.]** मौजे माळवाडी ता. मिरज, जि.सांगली हद्दीतील शेतजमीन गट क्र.६७ क्षेत्र ०हे.३७आर., आकार ४ रुपये, पैकी –०हे.९आर.

**ब.]** मौजे माळवाडी ता. मिरज, जि.सांगली हद्दीतील शेतजमीन गट क्र.६९ क्षेत्र ०हे.६९आर., आकार ७ रुपये ३७ पैसे, पैकी –०हे.१८आर. येथुन पुढे सदर मिळकतींना दावा मिळकती असे संबोधण्यात येईल.

**<u>वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे...</u>**

**०२.** वादीचे आजोबा व प्रतिवादी क्र.१ चे पती रावसाहेब हे दि.२९.०१.२०११ रोजी मयत झाले. प्रतिवादी क्र.२ हे मयत रावसाहेब यांचा मुलगा असुन सुजाता त्यांची पहिली पत्नी आहे. सदर लग्नसंबंधातुन वादी व प्रतिवादी क्र.४ रुपाली या दोन मुली झालेल्या आहेत. प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.३ यांचेसोबत बेकायदेशीर दुसरा विवाह केलेला आहे.

**०३.** दावा मिळकतीं या वादीचे आजोबा रावसाहेब शंकर वांजुळे यांच्या मालकी वहिवाटीच्या होत्या. रावसाहेब वांजुळे यांनी त्यांच्या हयातीमध्ये दावा मिळकतीबाबत दि.१८.१०.२०१० रोजी नोंदणीकृत मृत्युपत्र दस्त क्र.६०६५/२०१० तयार करुन ठेवलेले आहे. सदर मृत्युपत्रानुसार दावा मिळकती वादी व प्रतिवादी क्र.४ यांना समान मालकी हिश्याने दिलेल्या आहेत. रावसाहेब वांजुळे दि.२९.०१.२०११ रोजी मयत झालेले आहेत. मृत्युपत्रानुसार दावा मिळकतीच्या वादी व प्रतिवादी क्र.४ मालक झालेल्या आहेत.

**०४.** प्रतिवादी क्र.१ व २ यांनी रावसाहेब वांजुळे यांनी करुन ठेवलेल्या मृत्युपत्राची कल्पना वादीस न देता दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी त्यांच्या नावाची नोंद बेकायदेशीरपणे करुन घेतली. प्रतिवादी क्र.२ यांनी दि.२१.१०.२०१३ रोजी दावा मिळकतीमधील त्यांचा हक्क प्रतिवादी क्र.१ यांचे नावे कायमस्वरुपी सोडुन दिल्याचा बनाव केला. प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.३ यांच्यासोबत बेकायदेशीररित्या दुसरा विवाह केलेला असुन त्यानंतर जमीन गट क्र.६९ मधील मिळकत प्रतिवादी क्र.१ यांचेकडुन प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे नावे दि.०६.०२.२०२० रोजी नोंदणीकृत दस्त क्र.७२६/२०२० अन्वये बक्षीसपत्राने दिल्याचा बनाव केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ यांना दावा मिळकतीची कोणतीही मालकी नव्हती व नाही. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी संगनमताने वादीचा हक्क बुडवण्याच्या हेतुने सदरील बक्षीसपत्राचा बनाव केलेला आहे. सदरचे बक्षीसपत्र मुलतः बेकायदेशीर असुन वादी व प्रतिवादी क्र.४ यांच्यावरती बंधनकारक नाही. प्रतिवादी क.१ ते ३ दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी त्यांच्या नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवुन दावा मिळकती तबदील करण्याच्या प्रयत्नात आहेत. वादी व प्रतिवादी क्र.४ यांना मृत्यूपत्राने दावा मिळकतीची मालकी प्राप्त झालेली आहे. वादी व प्रतिवादी क्र.४ यांच्यामध्ये सरसनिरस मानाने

वाटप झालेले नाही. करीता प्रस्तुतचा दावा दाखल केला असे.

**०५.** प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना आदेशिका प्राप्त होवुनही प्रतिवादी गैरहजर राहिल्याने प्रस्तुतचा दावा त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालवण्याचा आदेश करण्यात आला.

**०६.** वादीने त्यांचे कथनाचे पृष्टयर्थ स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१२ वरती दाखल केले. वादीतर्फे सा.क्र.०२ विधीज्ञ वैशाली शिवाजी निळकंठ यांचे शपथपत्र नि.क्र.१९ वरती व सा.क्र.०३ सचिन आत्माराम नलवडे यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.२० वरती दाखल करुन नि.क्र.२६ वरती पुरावा संपल्याबाबतची पुरसीस दाखल केली.

**०७.** वादीने त्यांचे कथनाचे पृष्टयर्थ खालील कागदपत्रे दाखल केली.

| **अ.क्र.** | **कागदपत्राचा तपशील** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| **१.** | मौजे माळवाडी येथील जमीन गट क्र.६७ व ६९ चे ७/१२ उतारे. | **नि.क्र.१५ व नि.क्र.१६.** |
| **२.** | मौजे माळवाडी येथील खाते क्रमांक २१८ व १०२३ च्या खातेउताऱ्याची प्रत. | **नि.क्र.१७ व नि.क्र.१८.** |
| **३.** | मृत्युपत्र | **नि.क्र.२१** |
| **४.** | मौजे माळवाडी येथील दस्त क्र.७२६/२०२० दि.०७.०२.२०२० च्या सुची क्र.२ ची प्रमाणीत प्रत. | **नि.क्र.२८.** |

**०८.** प्रतिवादी यांनी कोणताही तोंडी अगर कागदोपत्री पुरावा सादर केला नाही.

**०९.** वादीचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे विधीज्ञ यांनी नि.क्र.२७ वरती लेखी युक्तीवाद दाखल केला. प्रतिवादी युक्तीवादासाठी गैरहजर राहिले.

१०. वादीचा दावा व पुरावा यावरुन खालील मुद्दे निर्णयाकरीता उपस्थीत झाले. सदरील मुद्दे व त्या मुद्दयांसमोर मी माझे निष्कर्ष नोंदवून त्याखाली कारणमीमांसा केली आहेः–

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी दावा मिळकतीचे रावसाहेब शंकर वांजुळे यांच्या दि.१८.१०.२०१० रोजीच्या नोंदणीकृत मृत्युपत्राआधारे मालक झाले असल्याचे सिध्द करतात काय ? | होकारार्थी. |
| २. | प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या हक्कामध्ये करुन दिलेले नोंदणीकृत बक्षीसपत्र दस्त क्र.७२६/२०२० वादीवरती बंधनकारक नसल्याचे वादी सिध्द करतात काय? | होकारार्थी. |
| ३. | वादी दावा मिळकतीमधील अर्धा हिस्सा वाटप होवुन मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी. |
| ४. | वादी घोषणा होवुन मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी. |
| ५. | वादी निरंतर मनाई आदेश मिळण्यास पात्र आहेत काय? | होकारार्थी. |
| ६. | कोणता आदेश व हूकूमनामा ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दे क्र.०१ ते ०६ करीताः–</u>**

११. सदर मुद्दे एकमेकांशी सुसंगत असून वादीने एकत्र पुरावा दिलेला असल्याने निर्णयाकरिता एकत्रीत घेतलेले आहेत.

१२. वादीच्या वादकथनानुसार दावा मिळकती या त्यांचे आजोबा रावसाहेब शंकर वांजुळे यांच्या मालकी वहिवाटीच्या होत्या. रावसाहेब वांजुळे यांनी त्यांच्या हयातीमध्ये दावा मिळकती वादी व प्रतिवादी क्र.४ यांना नोंदणीकृत मृत्युपत्रान्वये

दि.१८.१०.२०१० रोजी दिल्या. रावसाहेब वांजुळे दि.२९.०१.२०११ रोजी मयत झाले. रावसाहेब वांजुळे यांच्या पश्चात प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी त्यांच्या नावाची नोंद करुन घेतली व प्रतिवादी क्र.२ यांना प्रतिवादी क्र.१ यांचे हक्कामध्ये सदरील मिळकतीमधील हक्क सोडून दिला. दि.०६.०२.२०२० रोजी नोंदणीकृत दस्त क्र.७२६/२०२० अन्वये प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे हक्कामध्ये जमीन गट क्र.६९ मधील मिळकत बेकायदेशीर बक्षीसपत्रान्वये दिली. मृत्युपत्राआधारे वादी व प्रतिवादी क्र.४ हे दावा मिळकतीचे मालक झालेले असुन त्यांचा समसमान हिस्सा आहे. प्रतिवादी दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी असलेल्या त्यांच्या नावाच्या नोंदीचा गैरफायदा घेवुन दावा मिळकती तबदील करण्याच्या प्रयत्नात आहेत.

**१३.** वादीने नि.क्र.१२ वरती पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन दाव्यामधील कथनास दुजोरा दिलेला आहे. वादीतर्फे सा.क्र.०२ वैशाली शिवाजी निळकंठ यांनी नि.क्र.१९ वरती पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन दि.१८.१०.२०१० रोजी रावसाहेब वांजुळे यांच्या सांगण्यानुसार त्यांनी मृत्युपत्र तयार केल्याचे व त्यामधील मजकुर त्यांना वाचुन दाखवल्यानंतर सदरचा मजकुर बरोबर असल्याने त्यांच्यासमक्ष मृत्युपत्रावरती डाव्या हाताचा अंगठा केल्याचे कथन केले. वादीतर्फे सा.क्र.०३ सचिन आत्माराम नलवडे मृत्युपत्रावरील साक्षीदार यांनी नि.क्र.२० वरती पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन दि.१८.१०.२०१० रोजी रावसाहेब वांजुळे यांचे इच्छेप्रमाणे विधीज्ञ व्ही.एस.निळकंठ यांनी मृत्युपत्र तयार केल्याचे व त्यामधील मजकुर रावसाहेब वांजुळे यांना वाचुन दाखवल्यानंतर तो त्यांनी बरोबर असल्याचे सांगुन त्यांच्यासमक्ष मृत्युपत्रावरती रावसाहेब वांजुळे यांनी डाव्या हाताचा अंगठा केल्याचे व त्यावरती त्यांनी व दुसरे साक्षीदार सुकूमार रावसाहेब वांजुळे यांनी साक्षीदार म्हणुन सहया केल्याचे व

त्यानंतर सदरील मृत्युपत्र सह दुय्यम निबंधक यांच्याकडे नोंदवल्याचे कथन केले. प्रतिवादीतर्फे वादी तसेच वादीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार यांचा उलटतपास घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वादीतर्फे अभिलेखावरती सादर करण्यात आलेला पुरावा नाकारण्याइतपत कोणताही पुरावा अभिलेखावरती आलेला नाही.

**१४.** वादीने दावा मिळकतीचे ७/१२ उतारे नि.क्र.१५ व नि.क्र.१६ वरती दाखल केलेले असुन त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांचे नावे जमीन गट क्र.६७ मधील ०हे.९आर. व प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे नावे जमीन गट क्र.६९ मधील ०हे.१८.आर. क्षेत्राची नोंद असल्याचे नमुद आहे. वादीतर्फे नि.क्र.२८ वरती दस्त क्र.७२६/२०२० च्या सुची क्र.२ ची प्रत दाखल केलेली असुन त्यावरुन प्रतिवादी क्र.१ कमल यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे नावे बक्षीसपत्रान्वये जमीन गट क्र.६९ मधील ०हे.१८आर. क्षेत्र बक्षीस दिले असल्याचे दिसुन येते.

**१५.** नि.क्र.२१ वरती रावसाहेब शंकर वांजुळे यांचे नोंदणीकृत मृत्युपत्र दाखल केलेले असुन त्यावरुन रावसाहेब शंकर वांजुळे यांनी मौजे माळवाडी येथील जमीन गट क्र.६७ व ६९ मधील त्यांच्या हिश्श्याच्या ४ आणे मिळकती वादी प्राजक्ता व प्रतिवादी क्र.४ रुपाली यांना समसमान हिस्स्याने दिलेल्या असल्याचे व सदरील मृत्युपत्र विधीज्ञ व्ही. एस. निळकंठ यांनी तयार केलेले असल्याचे व त्यावरती साक्षीदार म्हणुन सचिन आत्माराम नलवडे व सुकूमार रावसाहेब वांजुळे यांनी सहया केलेल्या असल्याचे दिसुन येते. सदरील मृत्युपत्र हे नोंदणीकृत असुन वादीतर्फे तपासण्यात आलेले सा.क्र.०२ विधीज्ञ व्ही.एस.निळकंठ यांनी रावसाहेब वांजुळे यांचे इच्छेनुसार तयार केलेले आहे. सदरील मृत्युपत्रावरती वादीतर्फे तपासण्यात आलेले सा.क्र.०३ सचिन आत्माराम नलवडे यांनी साक्षीदार म्हणुन स्वाक्षरी केलेली आहे. वादीतर्फे तपासण्यात आलेले सा.क्र.०२ व ०३ यांनी सदरील मृत्युपत्रामधील मजकुर रावसाहेब वांजुळे यांच्या

सांगण्याप्रमाणे नमुद केल्याचे व सदरील मजकुर वाचुन दाखवल्यानंतर रावसाहेब वांजुळे यांनी डाव्या हाताचा अंगठा केल्याचे व त्यानंतर साक्षीदारांनी त्यावरती स्वाक्षऱ्या केल्याचे कथन केलेले आहे. वादीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची साक्ष नाकारण्याकरीता प्रतिवादीतर्फे उलटतपास घेण्यात आलेला नाही. नि.क्र.२१ वरील मृत्युपत्र हे नोंदणीकृत मृत्युपत्र आहे. त्यामुळे सदरील मृत्यूपत्रास गृहितक लागु होते. वादीने पुराव्याच्या कायद्यान्वये कलम ६८ अन्वये अभिप्रेत असलेला पुरावा अभिलेखावरती सादर करुन मृत्युपत्र सिध्द केलेले आहे. अनायसे नि.क्र.२१ वरील मृत्युपत्र रावसाहेब वांजुळे यांचे खरे मृत्युपत्र असल्याचे व त्याद्वारे त्यांनी दावा मिळकती वादी व प्रतिवादी क्र.४ यांना दिलेल्या असल्याचे सिध्द होते.

**१६.** वादीने प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या हक्कामध्ये करुन दिलेला बक्षीस पत्राचा दस्त क्र. ७२६/२०२० बेकायदेशीर असल्याचे घोषित होवुन मिळणेकरीता विनंती केलेली आहे. वरील चर्चेवरुन दावा मिळकती या रावसाहेब वांजुळे यांनी दि.१८.१०.२०१० रोजीच वादी व प्रतिवादी क्र.४ यांना नोंदणीकृत मृत्युपत्रान्वये दिलेल्या असल्याचे सिध्द झालेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांना प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या नावे नोंदणीकृत बक्षीसपत्रान्वये दावा मिळकती बक्षीस देण्याचा अधिकार दि.०६.०२.२०२० रोजी नसल्याचे सिध्द होते. अनायसे सदरील बक्षीसपत्र प्रतिवादी क्र.१ यांना कोणताही मालकी हक्क नसताना प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे नावे नोंदवले असल्याचे स्पष्ट होते. वादी व प्रतिवादी क्र.४ हे नोंदणीकृत मृत्युपत्रान्वये दावा मिळकतीचे मालक आहेत. वादी व प्रतिवादी क्र.४ यांनी दावा मिळकती तबदील केल्याबाबतचा कोणताही पुरावा नाही. त्यामुळे निश्चीतच प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे हक्कामध्ये करुन दिलेले नोंदणीकृत बक्षीसपत्र दस्त क्र.७२६/२०२० हे मालकी नसताना करुन दिलेले बक्षीसपत्र असल्याने

बेकायदेशीर आहे. त्यामुळे सदरील बक्षीसपत्र वादीवरती बंधनकारक नसल्याचे जाहीर होवुन मिळण्यास वादी पात्र आहे.

**१७.** वादीने दावा मिळकतीमधील त्यांचा अर्धा हिस्सा वाटप होवुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. नि.क्र.२१ वरील मृत्युपत्रामध्ये वादी व प्रतिवादी क्र.४ रुपाली यांना दावा मिळकती समसमान हिस्स्याने दिल्याचे सिध्द झालेले आहे. त्यामुळे वादी त्यांचा अर्धा हिस्सा वाटप होवुन मिळण्यास पात्र ठरतात.

**१८.** वादीने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा मिळकती तबदील करु नयेत म्हणुन निरंतर मनाई आदेश मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. वरील चर्चेवरुन वादी दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र.४ यांच्यासह मालक असल्याचे सिध्द झालेले आहे परंतु दावा मिळकती या प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या नावे महसुल दप्तरी नोंद आहेत. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेवुन दावा मिळकती तबदील केल्यास वादीचे अपरीमित नुकसान होणार आहे. करीता वादी प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई आदेश मिळणेकरीताही पात्र असल्याचे सिध्द होते.

**१९.** वरील चर्चेवरुन वादी व प्रतिवादी क्र.४ रुपाली हे दावा मिळकतीचे दि.१८.१०.२०१० रोजीच्या रावसाहेब वांजुळे यांच्या नोंदणीकृत मृत्युपत्रान्वये समान हिश्श्याने मालक असल्याचे सिध्द झालेले आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या हक्कामध्ये करुन दिलेले बक्षीसपत्र दस्त क्र.७२६/२०२० बेकायदेशीर असल्याचेही सिध्द झालेले आहे. वादी व प्रतिवादी क्र.४ यांचा दावा मिळकतीमध्ये समसमान हिस्सा असल्याने वादी त्यांचा अर्धा हिस्सा वाटप होवुन मिळण्यास पात्र असल्याचेही सिध्द झालेले आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा मिळकती तबदील करु नयेत म्हणुन निरंतर मनाई आदेश मिळण्यास वादी पात्र असल्याचेही सिध्द झालेले आहे. अनायसे वादी मागणी केल्याप्रमाणे घोषित होवुन

वाटप होवुन व निरंतर मनाई आदेश मिळण्यास पात्र आहेत. अनायसे वादीचा दावा खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी **मुद्दे क्र.१ ते ५** उत्तर **होकारार्थी** देवुन **मुद्दा क्र.६** करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे –

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादी व प्रतिवादी क्र.४ हे दावा मिळकतीचे दि.१८.१०.२०१० रोजीच्या नोंदणीकृत मृत्यूपत्र दस्त क्र.६०६५/२०१० अन्वये मालक असल्याचे घोषीत करण्यात येते. |
| ३. | प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या हक्कामध्ये दि.०६.०२.२०२० रोजी करुन दिलेले बक्षीसपत्र दस्त क्र.७२६/२०२० बेकायदेशीर असल्याचे घोषीत करण्यात येते. |
| ४. | वादीचा दावा मिळकतीमध्ये अर्धा हिस्सा असल्याचे घोषित होवुन वादी सदर हिश्श्याचा कब्जा मिळण्यास पात्र आहेत. |
| ५. | प्रतिवादी क्र.४ यांचाही दावा मिळकतीमध्ये अर्धा हिस्सा असल्याचे घोषीत करण्यात येते व प्रतिवादी क्र.४ यांनी त्यांच्या हिश्याचे न्यायालयीन शुल्क दिल्यानंतर सदरील हिस्सा त्यांना देण्यात यावा. |
| ६. | प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा मिळकती तबदील करु नयेत म्हणुन निरंतर मनाई आदेश पारीत करण्यात येतो. |
| ७. | दावा मिळकतीचे वाटप होवुन मिळणेकरीता दिवाणी प्रक्रीया संहिता कलम ५४ अनव्ये हुकूमनामा मा. जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे पाठवण्यात यावा. |
| ८. | येणेप्रमाणे प्राथमिक हुकूमनामा करणेत यावा. |
| ( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्धोषीत करण्यात आला). | |

RACHKAR SOPAN PANDURANG
Digitally signed by RACHKAR SOPAN PANDURANG
Date: 2026.07.28 16:55:13 +0530

**सांगली.**

**दिनांक २८.०७.२०२६.**

**(सोपान पां. राचकर)**
**सहावे सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर,**
**सांगली.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Kishori A. Chougule. (Grade-II) |
| Name of the Court | : | 6th Jt. Civil Judge Senior Division, Sangli. |
| Date of Order/Judgment | : | 28.07.2026. |
| Order Signed by Presiding Officer On | : | 28.07.2026. |
| Order uploaded on | : | 28.07.2026. |